महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

CIN No.U40109MH2005SGC153646

अधिक्षक अभियंता
एच.व्हि.डी.सी. ग्र.के.संवसु प्रविभाग, चंद्रपूर
सीटीपीएस कॉम्पलेक्स चंद्रपूर.
२४४५०५ ( का)
email ID- se4300@mahatransco.in

संदर्भ.क्र./अअ/एचव्हिडीसी/ग्र.के./संवसु/प्रविभाग/चंद्र/मासंवि/ №00560 दिनांक 10 MAY 2023

**शिकाऊ उमेदवार कायदा, १९६१ व सुधारीत १९८६ अंतर्गत वर्ष २०२३-२०२४ करीता निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती प्रतिक्षा निवड यादी क्र. ७.**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री या व्यवसायातुन राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांकडुन (Online) अर्ज मागविण्यात आले होते. अर्ज सादर करण्याची अंतिम दि. १४.०१.२०२३ होती व स्वहस्ते / पोस्टाने अर्ज सादर करण्याची अंतिम दि. २५.०१.२०२३ होती..

२. उमेदवारांची तात्पुरती निवड यादी तयार करण्यात आली असून, उमेदवारांची निवड यादी त्यांना S.S.C. व ITI (Electrician) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरीच्या आधारावर तसेच त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये दर्शविलेल्या जात, प्रवर्ग व इतर माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकुण गुण समान आहेत अश्या उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठ उमेदवाराची निवड करण्यात आलेली आहे.

४. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत गटात मोडत नसणे इ.. बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे ही पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील व सदर कागदपत्रे सादर करू न शकलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवारीसाठी उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. ही निवड यादी तात्पुरती असून, पूर्णत: उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात, प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणून निवड होणेसाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तींचा भंग होत असेल तर संबंधित उमेदवाराची उमेदवारी / निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश असलेला उमेदवार कागदपत्रे पडताळणीत अपात्र आढळून आल्यास अथवा कागदपत्रे पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र असून देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येवून त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सदर प्रतीक्षा यादीतील उमेदवार सुध्दा कागदपत्रे पडताळणीत अपात्र झाल्यास/कागदपत्रे पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र असून देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास त्या खालील गुणवत्ताधारक उमेदवाराची स्वतंत्र निवड / प्रतीक्षा यादी लावण्याचे अधिकार एच.व्हि.डी.सी. ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर राखुन ठेवत आहे.

७. तात्पुरत्या निवड यादी / प्रतीक्षा यादी तयार करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापी, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार एच.व्हि.डी.सी. ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर राखुन ठेवत आहे.

८. निवड न झालेल्या व प्रतीक्षा यादीतील उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्र व्यवहार एच.व्हि.डी.सी. ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर कार्यालयाकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

## Select List Open Category

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | SONALI SHRIKANT GAIKWAD | OPEN | 85.42 | |

९. तात्पुरती प्रतिक्षा निवड यादी क्र. ७ (Provisional Wait List No. 7 ) मधील उमेदवारांनी दि. १५.०५.२०२३ पूर्वी खाली नमूद केलेल्या पत्यावर सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.१५ या कार्यालयीन वेळेत मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहावे. दि. १५.०५.२०२३ नंतर मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**पत्ता :**

**अधिक्षक अभियंता**
**एच.व्हि.डी.सी. ग्र.कें.संवसू प्रविभाग**
**सि.टी.पी.एस. कॉम्पलेक्स,**
**निर्माण भवन मागे, उर्जानगर, चंद्रपूर-४४२४०४**

**(एन.व्ही. किरोलीकर)**
**अधिक्षक अभियंता**
**एचव्हिडीसी ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर**

**दिनांक : १०.०५.२०२३**